दै. सकाळ

# रंगरावदादा पाटील यांचे कोल्हापुरात निधन



कोल्हापूर, ता. २७ : क्रांतिवीर रंगरावदादा पाटील (वय ८७) यांचे आज सकाळी निधन झाले.

रंगरावदादा पाटील यांचा जन्म २५ डिसेंबर, १९१९ रोजी शिगाव (ता. वाळवा, जि. सांगली) येथे झाला. त्यांचे शिक्षण शिगाव, राजाराम हायस्कूल, कोल्हापूर, रयत शिक्षण संस्था, सातारा येथे झाले. १९३७ ते १९४८ पर्यंत रंगरावदादांनी राजकीय चळवळीत भाग घेतला होता. क्रांतिसिंह नाना पाटील, वसंतरावदादा पाटील, पांडू मास्तर, बर्डे गुरुजी, भाई माधवराव बागल, यशवंतराव चव्हाण यांच्यासमवेत रंगरावदादांनी स्वातंत्र्य चळवळीत योगदान दिले. १९४८ नंतर त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. महाराष्ट्र शासनाच्या स्वातंत्र्यसैनिक गौरव समितीवर अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले होते, तसेच सांगली जिल्हा स्वातंत्र्यसैनिक सन्मान समिती या संघटनेचे अध्यक्ष होते.

येथील ताराराणी विद्यापीठ संस्थेचे ते उपाध्यक्ष होते. ताराराणी विद्यापीठाचे सचिव प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील व राज्य सहकारी बँकेचे मुख्य अधिकारी विजयकुमार पाटील यांचे ते वडील होत. रक्षाविसर्जन गुरुवारी (ता. २९) पंचगंगा घाट येथे सकाळी दहा वाजता आहे.